नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ४ रे<br>Year - 4rd | अंक - २४<br>Issue - 24 | वार - गुरुवार दि. १८ जून २०२६<br>Blow- Thursday Date 18 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# आज राज्याच्या विधानपरिषदेतील ११ जागांसाठी मतदान

## निवडणुकीत ११ जागांसाठी एकूण ३१ उमेदवार रिंगणात ; ७०४३ मतदार त्यांच्या राजकीय भविष्याचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील उर्वरित अकरा जागांसाठी गुरुवारी मतदान होणार आहे. या निवडणुकीत एकूण ३१ उमेदवार रिंगणात असून ७०४३ मतदार त्यांच्या राजकीय भविष्याचा निर्णय घेणार आहेत. मतदान प्रक्रिया सकाळी नऊ ते दुपारी चार या वेळेत पार पडणार आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

या निवडणुकीसाठी एकूण सतरा जागा जाहीर करण्यात आल्या होत्या. मात्र अहिल्यानगर, ठाणे, यवतमाळ, पुणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली या सहा मतदारसंघांमध्ये उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे आता सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी (मविआ) यांच्यात उर्वरित अकरा जागांवर थेट लढत रंगणार आहे.

छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव, भंडारा-गोंदिया, धाराशिव-लातूर-बीड, सोलापूर, परभणी-हिंगोली, नांदेड, सांगली-सातारा, अमरावती आणि नागपूर या मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे.बहुतांश ठिकाणी त्रिकोणी लढतीचे चित्र दिसत असून जळगावमध्ये चौरंगी लढत रंगणार आहे. सोलापूर, नागपूर आणि धाराशिव-लातूर-बीड येथे थेट लढती अपेक्षित आहेत. या निवडणुकीची मतमोजणी २२ जून रोजी होणार असून, त्यानंतर राज्यातील राजकीय समीकरणांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

नाशिकमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नरेंद्र दराडे आणि शरद पवार गटाचे गोरख बोडके यांच्यात चुरशीची लढत होत आहे.छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपचे सुहास शिरसाट, उद्धव ठाकरे गटाचे गणेश लोखंडे आणि एमआयएम पुरस्कृत इशाक खान संदुखान यांच्यात त्रिकोणी संघर्ष पाहायला मिळत आहे. मतदानाच्या पूर्वसंध्येला सर्वच राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत बंडखोरी आणि क्रॉस व्होटिंगची भीती वाढली आहे. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही गटांनी आपापल्या मतदारांवर पकड मजबूत ठेवण्यासाठी रणनीती आखली आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी मतदान करणार असल्याने, ऐन-वेळी होणाऱ्या मतफुटीवरच निवडणुकीचा निकाल अवलंबून राहणार आहे.



# जूनच्या तिसऱ्या आठवड्यातही मान्सूनने देशाचा बराचसा भाग व्यापलाच नाही; पाऊस गेल्या सात दिवसांपासून तेलंगणात अडकला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जूनच्या तिसऱ्या आठवड्यातही मान्सून देशाच्या मोठ्या भागावर पोहोचू शकलेला नाही. आज १७ जून रोजी सकाळी घेतलेल्या उपग्रह छायाचित्रांनुसार, महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान आणि कर्नाटक या राज्यांवर मान्सूनचे ढग दिसत नाहीत. या राज्यांवर आकाश निरभ्र दिसत आहे. हवामान विभागाच्या मते, देशातील ७२३ जिल्ह्यांपैकी केवळ १०३ जिल्ह्यांमध्ये सामान्य पाऊस झाला आहे. याचा अर्थ देशाच्या ४० टक्के भागात सामान्यपेक्षा कमी पाऊस झाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बंगालच्या उपसागरात मजबूत कमी दाबाच्या क्षेत्राचा अभाव आहे. ४ जून रोजी केरळमध्ये दाखल झाल्यानंतर, मान्सून १३ दिवसांत १९ राज्यांमध्ये पोहोचला आहे. गेल्या सात दिवसांपासून तो तेलंगणातील भद्राचलम येथे अडकून पडला आहे. यामुळे छत्तीसगड, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात पावसाला उशीर झाला आहे.

मान्सूनचा पाऊस झाला नसला तरी, मान्सूनपूर्व हालचाली आणि स्थानिक प्रणालींमुळे बहुतांश राज्यांमध्ये तापमान ४०ओउ किंवा त्यापेक्षा कमी राहिले आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, गुजरात, बिहार, महाराष्ट्र, तेलंगणा आणि ओडिशा या राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेपासून दिलासा मिळाला आहे. बिहार, झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये पा-वसाची शक्यता आहे. बिहारच्या काही भागांमध्ये ताशी ५०-७० किमी वेगाने जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, तामिळनाडू, पुदुचेरी आणि कर्नाटकाच्या काही भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि विदर्भात मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. अनेक भागांमध्ये ताशी ४०-६० किमी वेगाने जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. सिक्कीम, उत्तर बंगाल, आसाम आणि मेघालयमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. राजस्थान आणि मध्य प्रदेशात ताशी ४०-६० किमी वेगाने वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यांसह पावसाची शक्यता आहे.

# युद्ध थांबणार , अमेरिका-इराण करारावर शुक्रवारी स्वाक्षरी होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वॉशिंग्टन डीसी : अमेरिका आणि इराण यांच्या युद्धबंदीच्या ऐतिहासिक कराराची घो-षणा झाली आहे. या करारावर शुक्रवारी स्वाक्षरी होणार आहे. पण, करारावर सही होण्यापूर्वीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला स्पष्ट शब्दात इशारा दिला आहे. करार मला पसंत पडला नाही किंवा त्यांनी व्यवस्थित वर्तन केले नाही तर पुन्हा इराणवर बॉम्ब वर्षाव करणार, असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. फ्रान्समध्ये जी७ सदस्य देशांच्या बैठकीत बोल-ताना डोनाल्ड ट्रम्प यांनी करारावर भाष्य केले.

चार महिन्याच्या संघर्षानंतर आणि प्रदीर्घ वाटाघाटीनंतर अखेर अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता करारावर एकमत झाले आहे. करारामध्ये युद्धबंदीचा कालावधी वाढवणे आणि होर्मुझ सामद्रधुनी खुली करण्याचा उल्लेख करण्यात आला आहे. शुक्रवारी (१९ जून) दोन्ही देशांमध्ये स्वित्झर्लंडमध्ये करारावर स्वाक्षरी होणार आहे. यापूर्वीच डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला वर्तन व्यवस्थित करण्याचा अन्यथा हल्ला करण्याच्या संभाव्य धोक्याबाबत सूचित केले आहे. ट्रम्प जी७ बैठकीसाठी सध्या फ्रान्समध्ये आहेत. यावेळी त्यांनी इराणबरोबरच्या करारावर देखील भाष्य केले.






दैनिक
# यश सिद्धि न्यूज

गुरुवार दि. १८ जून २०२६



## संपादकीय....

### पावसाची प्रतीक्षा

जूनच्या तिसऱ्या आठवड्यातही मान्सून देशाच्या मोठ्या भागावर पोहोचू शकलेला नाही. आज १७ जून रोजी सकाळी घेतलेल्या उपग्रह छायाचित्रांनुसार, म हाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान आणि कर्नाटक या राज्यांवर मान्सूनचे ढग दिसत नाहीत. या राज्यांवर आकाश निरभ्र दिसत आहे. हवामान विभागाच्या मते, देशातील ७२३ जिल्ह्यांपैकी केवळ १०३ जिल्ह्यांमध्ये सामान्य पाऊस झाला आहे. याचा अर्थ देशाच्या ४० टक्के भागात सामान्यपेक्षा कमी पाऊस झाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बंगालच्या उपसा- गरात मजबूत कमी दाबाच्या क्षेत्राचा अभाव आहे. ४ जून रोजी केरळमध्ये दाखल झाल्यानंतर, मान्सून १३ दिवसांत १९ राज्यांमध्ये पोहोचला आहे. गेल्या सात दिवसांपासून तो तेलंगणातील भद्राचलम येथे अडकून पडला आहे. यामुळे छत्तीसगड, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात पावसाला उशीर झाला आहे. मान्सूनचा पाऊस झाला नसला तरी, मान्सूनपूर्व हालचाली आणि स्थानिक प्रणालींमुळे बहुतांश राज्यांमध्ये तापमान ४० डिग्री अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा कमी राहिले आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, गुजरात, बिहार, महाराष्ट्र, तेलंगणा आणि ओडिशा या राज्यांम ध्ये उष्णतेच्या लाटेपासून दिलासा मिळाला आहे. बिहार, झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये पावसाची शक्यता आहे. बिहारच्या काही भागांमध्ये ताशी ५०-७० किमी वेगाने जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. आसाम, मेघालय, अरुणा- चल प्रदेश, तामिळनाडू, पुदुचेरी आणि कर्नाटकाच्या काही भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

# गावाच्या सर्वांगीण विकासासाठी झटणाऱ्या ध्येयवेड्या नेतृत्वाला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

## लोकाभिमुख, कर्तृत्ववान महिला सरपंच सौ. वनिता मधुकर सुरवसे यांना अभिष्टचिंतन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट प्रतिनिधी : काही व्यक्ती पदामुळे मोठ्या होत नाहीत, तर आपल्या दूरदृष्टी, कार्यतत्परता आणि लोकहिताच्या कार्यातून जनम नसात अढळ स्थान निर्माण करतात. गोगांवच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या, अभ्यासू, संवेदनशील आणि कर्तृत्ववान सरपंच सौ. वनिता मधुकर सुरवसे या अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक आ- हेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करताना प्रत्येक ग्राम स्थाच्या मनात अभिमान आणि कृतज्ञतेची भावना दाटून येते.

अक्कलकोट तालुक्यातील ऐतिहासिक गोगांवच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी स्वतःला सम र्पित केले आहे. सरपंचपदाची धुरा सांभाळल्यानंतर गावातील प्रत्येक घटकाचा विकास, प्रत्येक कुटुंबाचा सहभाग आणि प्रत्येक नागरिकाच्या जीवनमानात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या बळावर यशाचे शिखर गाठले. पती श्री. मधुकर सुरवसे यांच्या सहकार्याने समाजसेवेचा वसा स्वीकारत त्यांनी गावासाठी भरीव विकासनिधी उपलब्ध करून अनेक लोकोपयोगी आणि महत्त्वाकांक्षी विकासकामे साकार केली.

श्री कल्लेश्वर मंदिराचा विकास,गावातील सिमेंट काँक्रिट रस्ते, बंदिस्त गटारे, पेव्हर ब्लॉक, सभामंडप, सांस्कृतिक भवन, जलजीवन मिशन, आरोग्य सुविधा, ग्रामपंचायत इमारत तसेच विविध समाजघटकांसाठी मूलभूत सुविधांची उभारणी या कामांमधून त्यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो.

महिला सक्षमीकरण, वंचित आणि दुर्बल घटकांचे उत्थान, दिव्यांग व मागासवर्गीयांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, तसेच शिक्षण, सामाजिक समता आणि लोककल्याणासाठी सातत्याने कार्य करणे ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे त्यांचे नेतृत्व केवळ गोगांवपुरते मर्यादित न राहता संपूर्ण जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू म्हणून लौकिक मिळवलेल्या वनिता सुरवसे यांनी प्रशास- नातही उल्लेखनीय कार्य करून महिला नेतृत्वाचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या नेतृत्वाम ुळे गोगांव आज विकासाच्या नव्या पर्वाकडे आत्मविश्वासाने वाटचाल करत आहे.

वाढदिवसानिमित्त सौ. वनिता मधुकर सुरवसे यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड ऊर्जा आणि समाजसेवेच्या कार्यात उत्तरोत्तर यश लाभो, हीच सदिच्छा!

हार्दिक शुभेच्छा आणि अभिष्टचिंतन!

**- कमलाकर सोनकांबळे**

**संपादक - दैनिक यश सिद्धी न्यूज**
**उपसरपंच, गोगांव**
**अध्यक्ष - सिद्धार्थ सोशल फाउंडेशन**



# अक्कलकोट मध्ये एसीबीची मोठी कारवाई; १.२० लाखांची लाच स्वीकारताना दोन पोलिसांसह तिघे जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : (प्रतिनिधी) अक्कलकोट मध्ये एसीबीची मोठी कारवाई; १.२० लाखांची लाच स्वीकारताना दोन पोलिसांसह तिघे जाळ्यात अडकले असून, याप्रकरणी उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांची तडकाफडकी पोलीस मुख्यालयात बदली झाली आहे. यामुळे जिल्हा पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे.

दरम्यान उत्तर पोलीस ठाण्याशी संबंधित एका प्रकरणात स्कॉर्पिओ वाहन व मोबाईल परत देण्यासाठी तसेच तक्रारदाराच्या नातेवाईकांना मदत करण्याच्या मोबदल्यात १ लाख २० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मोठी कारवाई केलेली होती. या कारवाईत अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यातील दोन पोलिस कर्मचारी आणि त्यांच्यावतीने काम करणारा एक खासगी व्यक्ती एसीबीच्या जाळ्यात अडकला आहे.

या प्रकरणातील आरोपींमध्ये पोलीस हवालदार राजशेखर रामचंद्र कोळी, पोलीस कॉन्स्टेबल लक्ष्मीकांत दत्तात्रय देडे आणि खासगी व्यक्ती आकाश शरण्णाप्पा काडरामे यांचा समावेश आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या वडिलांचे आणि काकांचे नाव गुन्ह्यात टाकून अटक करण्याची भीती दाखवण्यात आली. तसेच

> **उत्तर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांची तडकाफडकी पोलिस मुख्यालयात बदली**

वाहन आणि मोबाईल परत मिळवून देण्यासाठी व नातेवाईकांना मदत करण्याच्या बदल्यात सुरुवातीला १ लाख ४० हजार रुपयांची मागणी करण्यात आली. नंतर तडजोडीनंतर ही रक्कम १ लाख २० हजार रुपयांवर निश्चित करण्यात आल्याचे एसीबीच्या तपासात निष्पन्न झाले.

एसीबीने १५ जून रोजी तक्रारीची पडताळणी केली असता लाचेच्या मागणीची पुष्टी झाली. त्यानंतर त्याच दिवशी सापळा रचण्यात आला. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यासम ोर आरोपी आकाश काडरामे याने पोलिस कर्मचाऱ्यांच्या वतीने १ लाख २० हजार रुपयांची रक्कम पंचांसमक्ष स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणात संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपींमध्ये पो- लीस हवालदार राजशेखर रामचंद्र कोळी, पोलीस कॉन्स्टेबल लक्ष्म ीकांत दत्तात्रय देडे आणि खासगी व्यक्ती आकाश शरण्णाप्पा काडरामे यांचा समावेश असून, यातील पो- लीस कर्मचारी हे गेल्या वर्षी दक्षिण पोलीस ठाण्यात कार्यरत होते. यापैकी आरोपी पोलिसांना गुंगारा देऊन पळालयाचे वृत्त आहे.

या प्रकरणातील तक्रारदाराने सदर पोलीस आरोपींचे अवैद्य धंद्यामध्ये भागीदार, आणि कोट्यावधीची मालमत्ता असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना पत्र देण्यात आले आहे. दरवर्षी पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या होतात, त्याच त्याच तालुक्यात बदली मुळे असे प्रकार घडत असल्याचे बोलले जात आहे.

# नीट पेपरफुटी, महागाई आणि शेतकरी प्रश्नांवर केंद्र व राज्य सरकारविरोधात काँग्रेसचे निषेध आंदोलन; तहसीलदारांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड, प्रतिनिधी : निफाड तालुका काँग्रेस कमिटी व निफाड युवक काँग्रेसच्या वतीने छएएढ परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, पेट्रोल-डिझेल व घरगुती गॅसच्या वाढत्या किमती कमी कराव्यात, शेतकऱ्यांना दिलासा द्यावा तसेच जनतेच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावेत, या मागण्यांसाठी निफाड तह- सील कार्यालयावर निवेदन देण्यात आले.




यावेळी आंदोलकांनी केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. निवेदनात म्हटले आहे की, छएएढ परीक्षा पेपरफुटीम ुळे लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले असून देशाच्या शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी परीक्षा प्रक्रिया अधिक सुरक्षित व पारदर्शक करावी.

तसेच पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या सातत्याने वाढणाऱ्या दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले असून म हागाईमुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. त्यामुळे इंधन दर कमी करून जनतेला तातडीचा दिलासा देण्याची मागणी करण्यात आली.

शेतकरी वर्ग वाढता उत्प- ादन खर्च, नैसर्गिक आपत्ती, अपुरा हमीभाव आणि आर्थिक संकटामुळे अडचणीत सापडला आहे. शेतमाल- ाला हमीभाव, आर्थिक सहाय्य व विविध शासकीय योजनांचा प्रभावी लाभ मिळावा, अशीही मागणी करण्यात आली.

या सर्व मागण्यांचे निवेदन तहसीलदारांमार्फत शासनाकडे पाठविण्यात आले. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.या प्रसंगी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन खडताळे यांनी प्रास्ताविक केले निफाड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनायक शिंदे जिल्हा सरचिटणीस सचिन होळकर तालुका सरचिटणीस सुरळीकर ,ॲड.संदेश मोगल, यांनी मनोगत व्यक्त केले स्वप्निल बिनायकिया यांनी आभार मानले.यावेळी. तालुका उपाध्यक्ष प्रभाकर हुजबंद अनिल शिंदे,अली भाई शेख जेष्ठ नेते संपत कराड सुनिल बिनायकीया करिमखा पठाण जिल्हा युवक उपाध्यक्ष जयदीप कुंदे जिल्हा सचिव सौरभ पगारे मनोज निरभवणे तालुका युवक उपाध्यक्ष तौसिफ राजे महेश क्षीरसाठ , बापु शिंदे , शाम शिंदे तानाजी बोडके राजाभाऊ होळकर आप्पा शिंदे कैलास कुंदे नितिन कुंदे सुरज साळ- वे दुर्योधन गांगुर्डे अलताब पठाण अमिन कुरेशी सागर खडताळे राजेंद्र गारे केशव गारे प्रविन साळवे राज- रतन डांगळे संदिप सोनवणे अर्जुन पानगव्हाणे भगवान झोंड गणेश मुके आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कै महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठानच्या वतीने गुणवंतांचा गुणगौरव सोहळ्यासाठी पंढरपूर व मंगळवेढा येथे विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद

# विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाली की समाजाच्या प्रगतीचा मार्ग सुकर होतो : व्याख्याते अविनाश भारती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/मंगळवेढा प्रतिनिधी- विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाली की सम ाजाच्या प्रगतीचा मार्ग सुकर होतो असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते कीर्तनकार व कवी अविनाश भारती यांनी व्यक्त केले आहे. कै महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठानच्या वतीने इयत्ता दहावी व इयत्ता बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व करियर मार्गदर्शन या कार्यक्रम पंढरपूर- मंगळवेढा विधानसभा म तदारसंघाचे आमदार समाधान आ- वताडे यांच्या हस्ते श्रीराम मंगल कार्यालय पंढरपूर येथे त्याचबरोबर जोगेश्वरी मंगल कार्यालय बायपास रोड मंगळवेढा येथे इयत्ता दहावी मधील ३२५ व बारावी मधील ३१० अशा एकूण ६२५ गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव संपन्न झाला. या कार्यक्रम ासाठी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून भारती यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणा मिळावी तसेच करिअरच्या नव्या संधींबाबत योग्य दिशा मिळावी या उद्देशाने व्याख्याते अविनाश भारती यांचे विशेष करियर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना आ आव- ताडे यांनी सांगितले की, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना त्यांच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि पालकांच्या योगदानाचे विशेष कौतुक होत असते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेक गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याचा विशेष आनंद झाला. आजच्या विद्यार्थ्यांम ध्ये प्रचंड क्षमता असून योग्य दिशा, सातत्यपूर्ण मेहनत आणि आत्म विश्वासाच्या बळावर ते भविष्यात मोठे यश संपादन करू शकतात, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करत असताना प्रसिद्ध व्याख्याते अविनाश भारती म्हणाले की,समाजातील गुणवंतांचा गौरव करणे म्हणजे केवळ व्यक्तींचा सन्मान नव्हे, तर परिश्रम, जिद्द आणि यशाचा गौरव होय. अशा उपक्रमांमुळे युवक-युवतींना प्रेरणा मिळते, समाजात सकारात्मक विचार रुजतात आणि पुढील पिढीसाठी आदर्श निर्माण होतात.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ज्ञान, संस्कार आणि कर्तृत्व यांचा समन्वय साधून जीवनात मोठी उद्दिष्टे निश्चित करण्याचे आवाहन करण्यात आले. शिक्षण हे केवळ करिअर घडविण्याचे साधन नसून समाज आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देण्याची शक्ती आहे.



आज सन्मानित झालेले गुणवंत विद्यार्थी हे उद्याचे शास्त्रज्ञ, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, शिक्षक आणि समाजाचे नेतृत्व करणारे जबाबदार नागरिक आहेत. त्यांच्या यशामागील पालकांचे कष्ट, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित करण्यात आले. समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव आणि गुणवत्तेचा सन्मान हीच प्रगती- शील समाजाची खरी ओळख आहे. अशा उपक्रमांमधून नव्या पिढीला प्रेरणा मिळते, आत्म विश्वास वाढतो आणि उत्कृष्टतेचा ध्यास घेण्याची ऊर्जा प्राप्त होते असेही ते यावेळी म्हणाले.

या कार्यक्रमासाठी युटोपियन शुगर चे चेअरमन उमेश परिचारक, बार्शीचे विजय राऊत, माजी नगराध्यक्ष प्रकाश गायकवाड, उपनगराध्यक्ष प्रा. येताळा भगत, पंढरपूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, माजी उपसभापती विजयसिंह देशमुख, नगरसेवक किरण घाडगे, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, रमेश भांजे, उद्योजक हणमंत दुधाळ, उद्योजक जनार्धन शिवशरण, यशोदा पतसंस्थेचे चेअरमन नीला आटकळे, पंढरपूर पंचायत समि तीचे सभापती डॉ शुभम आगा- वणे, मंगळवेढा पंचायत सभापती दिपाली ताड, उपसभापती अर्जुन मल्लाळे, प्रतिष्ठानचे सचिव सरोज काझी, कार्याध्यक्ष आझाद दारूवाले, संचालक दादासाहेब ओमणे, संचालक संजय माळी, त्याचबरोबर कै.महादेवराव बाबुराव अवताडे प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ, नगरपरिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी तसेच अनेक गुणवंत विद्यार्थी पालक मार्गदर्शक शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# विधान परिषद स्थानिक प्राधिकारी निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज; सहा मतदान केंद्र व ६१६ मतदार संख्या

## गुरुवार, दिनांक १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. जिल्ह्यातील सहा मतदान केंद्रावर एकूण ६१५ मतदार(एक मतदार मयत) मतदानाचा हक्क बजावणार आहेत. नियोजन भवन येथून सहा मतदान केंद्राचे केंद्राध्यक्ष व अन्य अधिकारी कर्मचारी यांनी निवडणूक साहित्य घेऊन निवडणूक केंद्रावर रवाना झालेले आहेत. ही निवडणूक प्रक्रिया निर्भय व शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिली.





अधिसूचना -

या निवडणुकीसाठी अधिसूचना २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध झाली असून नामनिर्देशन दाखल करण्याची शेवटची तारीख १ जून होती. छानती २ जून रोजी पार पडली तर अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख ४ जून होती. मतदान १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार असून मतमोजणी २२ जून रोजी सकाळी ८ वाजता नियोजन भवन, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे होणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २५ जूनपर्यंत पूर्ण होणार आहे.

निवडणूक निरीक्षक:-

या निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून आयएएस अधिकारी श्री. श्रवण पी. हार्डीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी सोलापूर हे निवडणूक निर्णय अधिकारी असून निवासी उपजिल्हाधिकारी सोलापूर हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आहेत.

एकूण मतदार संख्या:-

जिल्ह्यातील स्थानिक संस्थांमध्ये एक जिल्हा परिषद, एक महानगरपालिका व १७ नगरपरिषद/नगरपंचायत अशा एकूण १९ संस्था असून त्यातील मतदारसंख्या ५४४ आहे. याशिवाय ४९ नामनिर्देशित व २३ अध्यक्ष मिळून एकूण मतदारसंख्या ६१६ इतकी आहे.या निवडणुकीसाठी एकूण १५ नामनिर्देशन अर्ज दाखल झाले होते. अंतिमतः २ उमेदवार निवडणुकीत उभे राहिले आहेत.

मतदान केंद्र व अधिकारी :-

जिल्ह्यात एकूण ६ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. कुर्डूवाडी येथे ८०, उत्तर सोलापूर येथे १८८, दक्षिण सोलापूर येथे ८९, पंढरपूर येथे १००, मंगळवेढा येथे ६२ व अकलूज येथे ९७ मतदारांची व्यवस्था असून पुरुष व महिला मतदारांची संख्या प्रत्येकी ३०८ अशी आहे.मतदान केंद्रांवर तहसीलदार हे केंद्राध्यक्ष असतील. नायब तहसीलदार, अव्वल कारकून, लिपिक व शिपाई यांची नेमणूक मतदान अधिकारी व कर्मचारी म्हणून करण्यात आली आहे. तसेच सूक्ष्म निरीक्षकांचीही नेमणूक झाली आहे.

मतदारांची ओळख:-

मतदारांची ओळख पटविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे मुख्याधिकारी व गटविकास अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.या निवडणुकीत एक मृत मतदाराची नोंद झाली असून दिव्यांग मतदारांची संख्या शून्य आहे. प्रतिबंधात्मक नजरकैदेत असलेले मतदारही शून्य आहेत.डतएएझ उपक्रमांतर्गत ६१६ मतदारांना मतदान केंद्राची माहिती देण्यात आली आहे. उमेदवारांची बैठक घेण्यात आली असून त्यांना मतदान केंद्रांची यादी व मतदान प्रक्रियेची माहिती देण्यात आली आहे.

पसंती क्रमांक व जांभळा स्केचपेन-

मतदानासाठी मतदारांनी उमेदवाराच्या नावासमोर पसंतीक्रम अंकात लिहावा लागणार आहे. पहिली पसंती दर्शविण्यासाठी '१' अंक लिहिणे बंधनकारक आहे. भारत निवडणूक आयोगाने पुरविलेला जांभळा स्केचपेन वापरणे आवश्यक आहे. अंक शब्दांत लिहिल्यास किंवा चुकीच्या पद्धतीने नोंदवल्यास मतपत्रिका अवैध ठरेल.

प्रशिक्षण:-

या निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचारी व सूक्ष्म निरीक्षक यांना निवडणूक विभागाच्या वतीने चार प्रशिक्षण देण्यात आलेले आहेत. प्रशिक्षण दरम्यान प्रत्येकाचे जबाबदारी व कर्तव्य सांगण्यात आलेली असून त्यांना प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया कशा पद्धतीने घ्यावयाची याचे ही प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्यामुळे सर्व मतदान अधिकारी व कर्मचारी निवडणुकीसाठी प्रशिक्षित झालेले आहे.

मतदान साहित्य वितरण-

मतदान साहित्याचे वितरण १७ जून रोजी नियोजन भवन, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे झाले आहे. सहा मतदान केंद्रावर मतदान अधिकारी व कर्मचारी साहित्यासह रवाना झालेले आहेत.

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व काटेकोरपणे पार पडावी यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान पार पडणार आहे.

# सोलापूर जिल्हा शिवसेना ओबीसी विभागाच्या पदाधिकाऱ्यांची मीटिंग व मुलाखती उत्साहात पार पडल्या




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी - दिनांक १६जुन रोजी श्री संत सेना महाराज मठ पंढरपूर या ठिकाणी शिवसेना (शिंदे गट) जिल्हा ओबीसी विभागाच्या पदाधिकाऱ्यांची मीटिंग व मुलाखती पार पडल्यामुळे मुलाखतीमध्ये पंढरपूर तालुका शहर व ग्रामीण मंगळवेढा तालुका शहर व ग्रामीण मोहोळ तालुका शहर व ग्रामीण इच्छुकांनी मुलाखती दिल्या मुलाखती दिल्यानंतर त्यांच्या निवडीही करण्यात आल्या एकूण मुलाखती १७ झाल्या वरील प्रमाणे मुलाखती पार पडल्या यावेळी शिवसेनेचे ओबीसी विभागाचे जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील उपजिल्हाप्रमुख प्रदीप भोसले उपजिल्हाप्रमुख दादासाहेब लोखंडे व पंढरपूर तालुकाप्रमुख मल्हारी बनसोडे पंढरपूर शहरप्रमुख सचिन देवमारे यांच्यासह शिवसेनेचे अधिक मोठ्या संख्येने शिवसैनिक पदाधिकारी ही उपस्थित होते.

# पाण्याअभावी अंधेरी-घाटकोपर लिंक रोडवरील दुभाजकातील झाडे सुकली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज) ;घाटकोपर अंधेरी लिंक रोडवरील जागृती नगर ते साकीनाका जंक्शन दरम्यान असलेल्या दुभाजकावर एमएमआरडीए कडून सुशोभीकरणांतर्गत विविध प्रकारची शोभेची झाडे लावण्यात आली होती.या झाडांची पूर्ण क्षमतेने वाढही झाली,त्याकरिता या झाडांना वेळोवेळी पाणी देण्याचे काम महापालिकेच्या वतीने करण्यात आले होते.मात्र सध्या अनेक दिवसापासून या झाडांना पाणी न मिळाल्याने पाण्याअभावी ही झाडे सुकली असून अनेक झाडे पूर्णपणे जळून गेल्याचे चित्र आहे. अंधेरी घाटकोपर मेट्रोच्या कामादरम्यान या रस्त्यावरील दुभाजकाचे बांधकाम करून विविध प्रजातीची झाडे लावण्यात आली. शिवाय या दुभाजकाला लोखंडी जाळीही बसविण्यात आली त्यामुळे त्याच्या सौंदर्यात आणखी भर पडली.रात्रीच्या वेळी समोरील वाहनाची लाईट चालकाच्या डोळ्यावर पडू नये, हवामानाचे संतुलन राखले जावे आणि त्या माध्यमातून शहराचे सौंदर्यीकरण व्हावे या उद्देशाने सदर दुभाजकाचे सौंदर्यीकरण करण्यात आले होते. मात्र गेले अनेक दिवसापासून या झाडांकडे महापालिकेने पूर्णतः दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.त्यामुळे सध्या या झाडांची अवस्था अत्यंत खराब झाली असून अनेक झाडे पाण्याअभावी सुकून गेली तर अनेक झाडे पूर्णपणे जळून गेल्याचे पाहायला मिळते.



मुंबईचे तापमान आणि उष्णतेचा विचार करता या काळात झाडांना मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता होती. मात्र पालिकेने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने गेले कित्येक दिवस या झाडांना पाणी मिळाले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे या झाडांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून संबंधित यंत्रणेने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन या झाडांना वेळेवर पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी स्थानिक नागरिक आणि प्रवाशांकडून होत आहे.

**महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक २०२६....**

# मुक्त व निष्पक्ष वातावरणात मतदानाची प्रक्रिया पार पाडावी : निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तीकेयन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने सोलापूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघासाठी दिनांक १८ जून २०२६ रोजी सकाळी आठ ते दुपारी चार या कालावधीत जिल्ह्यातील सहा मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. तरी या निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी कर्मचारी तसेच मतदान अधिकारी व कर्मचारी यांनी हे मतदानाची प्रक्रिया मुक्त व निष्पक्ष वातावरणात होण्यासाठी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी असे निर्देश जिल्हाधिकारी तथा सोलापूर स्थानिक प्राधिक अधिकारी मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिले.




नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित मतदान अधिकारी व कर्मचारी यांच्या शेवटच्या प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्हाधिकारी कार्तीकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे यांच्या सह सर्व तहसीलदार व अन्य मतदान अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकीय म्हणाले की, सर्व मतदान अधिकारी व कर्मचारी यांनी मतदानाची प्रक्रिया व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेले साहित्य मतदान केंद्रावर व्यवस्थितपणे घेऊन जाणे व मतदान केंद्रावर मुक्काम करून सकाळी मतदानाची प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सुरू करणे ही त्यांची जबाबदारी आहे व त्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. मतदान केंद्रावर कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक गॅजेट कोणीही आणणार नाही याची दक्षता घ्यावी नियुक्त करण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी व्यवस्थित पोलीस बंदोबस्त मतदान केंद्रावर ठेवावा, असेही त्यांनी निर्देशित केले.

सहाही मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रियेचे वेब कास्टिंग करण्यात येणार आहे तसेच त्याचे नियंत्रण जिल्हा कार्यालयातून केले जाणार आहे त्यामुळे सर्व मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे तसेच काही अडचण आल्यास तात्काळ जिल्हा कार्यालयाशी संपर्क करावा. निवडणूक प्रक्रिया अत्यंत गांभीर्यपूर्वक घ्यावी यत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी. तसेच मतदान केंद्रावर वेब कास्टिंग केले जाणार असून त्यासाठी जनरेटरची व्यवस्था करण्यात आलेली आहे तसेच वीज वितरण कंपनीने जिल्ह्यात सर्व मतदान केंद्रावरील वीज पुरवठा सुरळीत राहील या दृष्टीने दक्षता घ्यावी, असेही निर्देश जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी दिले.

निवडणूक प्रक्रिया पार पाडणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे : निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर

मतदान अधिकारी व कर्मचारी यांना सूचना करताना श्री. हार्डीकर म्हणाले की, निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पाडणे हे सर्व अधिकारी कर्मचारी यांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. दिलेल्या प्रशिक्षणाप्रमाणे मतदान व मतमोजणीच्या दिवशी कामकाज करणे अनिवार्य आहे. कोणतीही अनुचित घटना सांगून होत नाही त्यामुळे सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी अत्यंत काळजीपूर्वक मतदान प्रक्रिया पार पाडावी व त्यानंतर मतपेट्या स्ट्राँग रूममध्ये आणून जमा कराव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या.

मतदान केंद्रावर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील या दृष्टीने तहसीलदार यांनी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्या संपर्कात राहावे व त्या अनुषंगाने आजच कार्यवाही करणे अपेक्षित आहे. मतदान केंद्र परिसरात १०० मीटर पर्यंत पोलीस बंदोबस्त दक्ष राहील या दृष्टीने संबंधित तहसीलदार यांनी काळजी घ्यावी. सर्व मतदान अधिकारी व कर्मचारी यांनी अत्यंत चौकस राहून आपली जबाबदारी पार पाडावी अशाही सूचना श्री. हार्डीकर यांनी दिल्या.

उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना आजचे चौथे प्रशिक्षण देऊन निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सर्व प्रकारच्या सूचना दिल्या. उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे यांनी सर्व मतदान अधिकारी कर्मचाऱ्यांनी मतपत्रिकेची गोपनीयता ठेवावी. तसेच मतदान केंद्रावर मतदान वेळ संपताना आलेल्या मतदारांना व्यवस्थित क्रमांक देऊन आत मध्ये घ्यावे. तसेच मतदान प्रक्रिया पार पाडत असताना मतदान केंद्रावर कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक गॅजेट कोणीही घेऊन येणार नाही या दृष्टीने व्यवस्थित तपासणी करावी, असेही त्यांनी सूचित केले.

**मतदान साहित्य वितरण–**

प्रशिक्षण कार्यक्रमानंतर सर्व सहा मतदान केंद्रावरील मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक विभागाच्या वतीने निवडणूक साहित्य वाटप करण्यात आले. व या सहा मतदान केंद्रावरील सर्व निवडणूक अधिकारी व कर्मचारी पोलीस बंदोबस्तासह ते साहित्य घेऊन मतदान केंद्राकडे रवाना झाले.

मतदान केंद्र- उपविभागीय अधिकारी कुर्डूवाडी, उत्तर तहसील कार्यालय, दक्षिण तहसील कार्यालय, पंढरपूर तहसील कार्यालय, मंगळवेढा तहसील कार्यालय आणि उपविभागीय अधिकारी कार्यालय अकलूज.

# जिल्ह्यात अल-निनोच्या पार्श्वभूमीवर मान्सून लांबणीची शक्यता; पाणी काटकसरीने वापरावे : जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन



## जलप्रकल्पांतील उपलब्ध साठ्याचा आढावा सादर करण्याचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) - अल-निनोच्या प्रभावामुळे येणारा मान्सून लांबणीवर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन येत्या काळातील पाणी टंचाई टाळण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिले. उपलब्ध पाणीसाठा प्राधान्याने केवळ पिण्याच्या पाण्यासाठी वापरण्यात यावा, तसेच पाण्याची गळती, गैरवापर आणि थेट जलाशयातून उपसा शेतीसाठी होणे याबाबत तात्काळ कारवाई करण्याबाबत त्यांनी निर्देशित केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित अल- निनो व टंचाईच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तीकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी महसूल उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर, जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रवीण पाटील, अधिक्षक अभियंता उजनी धरण सकृत खांडेकर, कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद सपताळे, उप अभियंता सोलापूर महानगरपालिका एस. व्ही. एकबोटे, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग आर्यन पवार, कार्यकारी अभियंता भीमा विकास विभाग प्रशांत कडुसकर, कार्यकारी अभियंता उजनी धरण व्यवस्थापन सुचेता डुंबरे, कार्यकारी अभियंता भीमा पाटबंधारे विभाग पंढरपूर जी. एस. कथले, वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण डॉ. एम. जे. शेख, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन ए. एस. तांबे, महावितरण चे अधीक्षक अभियंता सुनील माने उपस्थित होते.

जलसंपदा विभागाने लघु, मध्यम बंधारे व धरणे या जलप्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठ्याची माहिती सादर करून पाण्याचे नियोजन करावे. त्याचा आढावा पुढील बैठकीत सादर करण्याचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिला.

जिल्ह्यातील जल प्रकल्पांबाबत सध्या उपलब्ध माहितीनुसार जिल्ह्यात ७ मध्यम प्रकल्प, ५६ लघु प्रकल्प आणि ९० उपजलप्रकल्प आहेत. यापैकी ७ मध्यम प्रकल्पांपैकी ६ प्रकल्पांमधील पाणी पिण्यासाठी वापरता येईल, अशी माहिती देण्यात आली. तसेच उजनी धरणात सध्या ५०.६१ टीएमसी इतका पाणीसाठा शिल्लक असल्याचे अधीक्षक अभियंता उजनी धरण सकृत खांडेकर यांनी सांगितले.

पंढरपूर येथील पिराची कुरोली येथील पाणी पंढरपूरला घेण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांचा विरोध असल्याचे कार्यकारी अभियंता खांडेकर यांनी सांगितले. घाटणी बंधाऱ्यातील पाणी कोळेगाव बंधाऱ्यात सोडल्यास १५ जुलैपर्यंत पाणीपुरवठा होईल, अशी माहिती देण्यात आली.

शेतीपंपांचे डायरेक्ट कनेक्शन बंद करण्याबाबत सूचना-

उजनी जलाशयाच्या पाण्यासाठी शेतीपंपाचे डायरेक्ट कनेक्शन बंद करण्याबाबत माहिती देण्यात आली. तसेच शेतकऱ्यांनी ७५ ते १०० मिलिमीटर पाऊस होईपर्यंत पेरणी करू नये, असे अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सांगितले. कमी पाण्यावर येणारी पिके आणि आंतरपिके घेऊन, कमीत कमी येणाऱ्या पावसावर मूग आणि उडीद वगळता इतर पिके घेण्याचा सल्लाही देण्यात आला.

भरारी पथके - भरारी पथकांमार्फत गैरवापरावर तात्काळ कारवाई

भविष्यातील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी तहसीलदार, प्रांत अधिकारी, पोलीस विभाग, जलसंपदा अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्फत भरारी पथके तयार करण्याचे निर्देश दिले. ज्या ठिकाणी थेट जलाशयातून पाणी उपसा करून शेतीसाठी वापर होत असेल, अशा ठिकाणी कारवाई करून तो उपसा तात्काळ थांबवावा. तसेच जलसंपदा विभागातील मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये पाण्याची गळती होत असल्यास ती तात्काळ थांबवण्यासाठी उपाययोजना करावी, अशा सूचना दिल्या. नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत, महापालिका यांच्या पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असल्यास ती दुरुस्त करण्याचे निर्देशही देण्यात आले.

पाणीबचतीसाठी जनजागृती आणि दैनंदिन वापरावर निर्बंध-

अल-निनोमुळे संभाव्य दुष्काळाचा धोका लक्षात घेऊन सर्व नगरपालिका, नगरपरिषद, महापालिका, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा. तसेच पाणीबचत आणि काटकसरीने पाण्याचा वापर याबाबत लोकांमध्ये जनजागृती करण्यास सांगण्यात आले.

ग्रामपंचायत स्तरावर पाण्याचे महत्व समजावण्याबाबत जिल्हा परिषदेचे सी.ओ. बीडाओ यांनी सूचना द्याव्यात, असेही नमूद करण्यात आले. शहरातील स्विमिंग पूल व वाहन धुण्याचे सेंटर तात्काळ बंद करण्याचे निर्देश देण्यात आले.

शेतकऱ्यांनी ७५ ते १०० मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये, याबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांनी त्यांच्या तालुक्यातील शेतकऱ्यांना सांगण्याच्या सूचना देण्यात आल्या.

चारा छावण्या आणि टँकर पाणीपुरवठा व्यवस्थापन-

ज्या भागात टँकरची मागणी येईल, त्या दिवशी त्या गावात टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी आदेश निघणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले. पशुसंवर्धन विभागाने चारा छावण्या उभारण्याची वेळ येणार नाही, असा प्लॅनिंग करून तो पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचनाही दिल्या.

प्रांत अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन व तात्काळ तयारी-

प्रांत अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात आढावा बैठका घेऊन पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे. तसेच आजच भरारी पथकासाठी विविध विभागांनी कर्मचाऱ्यांची माहिती तात्काळ द्यावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सुचित केले.

तसेच दूरदृश्य प्रणालीवरून सर्व उपविभागीय अधिकारी व तालुका स्तरावरील तहसीलदार, गट विकास अधिकारी व इतर अधिकारी उपस्थित होते.

---

## सिद्धेवाडी गाव भेटीत खासदार प्रीती शिंदे यांनी जाणून घेतल्या ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या समस्या, विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुराव्याचे आश्वासन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर प्रतिनिधी - सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील सिद्धेवाडी येथे ग्रामस्थांना भेटून त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ग्रामस्थांचे निवेदन स्वीकारून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या

प्रमोशनच्या वतीने सरपंच मोहन माने यांनी विविध मारण्याचे निवेदन खासदार पणिती शिंदे यांच्याकडे सादर केले.

यामध्ये काही उपसाच चिंचणी यांना टप्पा तीन अंतर्गत शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणीपुरवठा करणे व माढा सिद्धेवाड रस्त्याची डांबरीकरण सिद्धेश्वर देवस्थान समोर सभा मंडप उभारणे पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा करणे व एसटी बसच्या गावात मुक्काम ठेवणे व तसेच कृषी क्षेत्रातील संबंधित प्रश्न सोडवणे हे ग्रामस्थांचा प्रमुख प्रश्न होता. यावेळी खासदार पंडित शिंदे यांनी उपस्थि ग्रामस्थांचे प्रश्न संबंधित अधिकाऱ्यास दूरध्वनीद्वारे संपर्क करूनश समस्या तात्काळ सोडवण्याचा प्रयत्न केला. पावसाचा संवाद साधला शिंदे म्हणाले की कोणत्याही समाजासाठी माझी भेट व संपर्क साधावा पुण्यतिथी शिंदे यांनी ग्रामस्थांना सांगितले.

यावेळी काम पेटी प्रसंगी तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश आप्पा पवार, सरपंच मोहोत माने जगन्नाथ माने, साहेबराव निकम अजय यादव, भाऊसाहेब माने, सुनील खडके यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जवळा खुर्दच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप; विमलताई पवार स्मृतिदिना निमित्त उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब (प्रतिनिधी) - शिक्षण हाच खरा वारसा या विचाराने प्रेरित होऊन कळंब तालुक्यातील जवळा खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शुक्रवारी शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. स्व. विमलताई बाळासाहेब पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा उपक्रम राबवण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आधार मिळावा, या उद्देशाने स्व. विमलताईंचे चिरंजीव श्री. व्यंकट बाळासाहेब पवार यांनी संपूर्ण साहित्याचे प्रायोजन केले. कळंब पंचायत समितीचे माजी सभापती श्री. गुणवंत साहेबराव पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, पाठ्यपुस्तके, चित्रकला व सर्जनशीलता किट, गणवेश आणि शालेय साहित्य पाकिटे वाटप करण्यात आली.

या प्रसंगी बोलताना गुणवंत पवार म्हणाले की, विमलताईंना शिक्षणाची प्रचंड आवड होती. त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी आणि गावातील एकही मुलगा शिक्षणापासून वंचित राहू नये, या भावनेतून आम्ही हा उपक्रम सुरू केला आहे.

शाळा परिसर फुगे आणि रंगीबेरंगी फुलांनी सजवण्यात आला होता. नवीन साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या उपक्रमाला गावातील नागरिक, शिक्षक व पालकांनी मोठा प्रतिसाद दिला. शाळेचे मुख्याध्यापक श्री. कदम यांनी सांगितले की, पवार परिवाराने विद्यार्थ्यांना केवळ साहित्यच दिले नाही, तर स्वप्न पाहण्याची उर्मीही दिली आहे. ग्रामीण भागात शिक्षणासाठी अशी सामाजिक बांधिलकी ही काळाची गरज असून, पवार परिवाराने तो आदर्श घालून दिला आहे. यावेळी ग्रामस्थ, पालक,व शिक्षणप्रेमी नागरीक उपस्थित होते.

---

**भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संघटक संजय भालेराव यांच्या हस्ते विहारचे उद्घाटन**

## श्रावस्ती बुद्ध विहार उद्घाटन समारंभ आणि बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी मिलिंद जाधव - श्रावस्ती बहुउद्देशीय बहुजन सामाजिक संस्था वासिंद यांच्या विद्यमाने पुनर्बांधणी करण्यात आलेल्या श्रावस्ती बुद्ध विहाराचे उद्घाटन समारंभ आणि बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना हा कार्यक्रम काल शनिवार दिनांक १३ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्रावस्ती बुद्ध विहार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाजवळ वासिंद पूर्व येथे श्रावस्ती बहुउद्देशीय बहुजन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रामा रुंझु घोडेस्वार यांच्या अध्यक्षतेखाली व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पाडण्यात आला.

यावेळी श्रावस्ती बुद्ध विहाराचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संघटक, शहापूर मुरबाड तालुका प्रभारी तथा श्रावस्ती बहुउद्देशीय बहुजन सामाजिक संस्थेचे सचिव संजय बन्सी भालेराव यांच्या हस्ते, शहापूर विधानसभा आमदार दौलत दरोडा, शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या उपस्थितीत करण्यात आला. तर बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना शहापूर विधानसभा आमदार तथा अनुसूचित जमाती कल्याण समिती प्रमुख राज्यमंत्री दर्जा दौलत भिकाजी दरोडा यांच्या हस्ते तसेच भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण शेठ एन. के. टी. ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शहापूर विधानसभा आमदार तथा अनुसूचित जमाती कल्याण समिती प्रमुख राज्यमंत्री दर्जा दौलत भिकाजी दरोडा,

शेठ एन. के. टी. ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष नानजीभाई खिमजीभाई ठक्कर उपस्थिती होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाची महाराष्ट्र प्रदेश सहसचिव बाळकृष्ण गायकवाड, भारतीय बौद्ध महासभा शाखा ठाणे जिल्हा हिशोब तपासनीस भरत नाना घनघाव, जिल्हा संस्कार सचिव कांतिलाला भीमराव भडांगे, शाखा शहापूर तालुका सरचिटणीस प्रभाकर थोरात, शाखा मुरबाड तालुका प्रचार पर्यटन सचिव राजेश शांताराम पवार,

शाखा वासिंद पूर्व अध्यक्षा ज्योती सुनिल कोबाळकर,

वासिंद ग्रामपंचायत सरपंच राजेंद्र सिताराम म्हसकर, माजी उपसरपंच विलास वामन पाटील,

धम्मदीप बुद्धिस्ट कल्चरल संस्था अध्यक्ष ड. अविनाश थोरात, फुले आंबेडकर पथपेढीचे अध्यक्ष राजेश निकम, सामाजिक कार्यकर्त्या आशा वामन जाधव यांची अतिथी म्हणून उपस्थिती होती. हा कार्यक्रम श्रावस्ती बहुउद्देशीय बहुजन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रामा रुंझु घोडेस्वार

यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवर व धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

या कार्यक्रमात शुभेच्छा देताना नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांनी बुद्ध विहार निर्मिती बाबत संस्थेचे कौतुक केले आणि असे बुद्ध विहार प्रत्येक गावात झाले पाहिजे असे सांगत विहारासाठी वास्तुरुपात दान जाहीर केले आणि संस्थेस शुभेच्छा दिल्या. तर आमदार दौलत दरोडा यांनी शुभेच्छा देताना संस्थेस शौचालय बांधून देण्याचे अभिवचन देत शौचालयाचे बांधकाम सुरू करण्यास सांगितले. तसेच सरपंच राजेंद्र म्हसकर यांनी देखील वास्तुरूपात दान देण्याचे जाहीर केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रावस्ती बहुउद्देशीय बहुजन सामाजिक संस्थेचे सचिव संजय बन्सी भालेराव यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन संस्थेचे सदस्य तथा सिने अभिनेते सुनिल जगताप यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष रामा रुंझु घोडेस्वार, कोषाध्यक्ष सुनिल बाबुराव कोबाळकर, सचिव संजय बन्सी वंचित बहुजन आघाडीचे ठाणे जिल्हा संघटक नरेश मधुकर उबाळे यांनी विशेष मेहनत घेतली तर संस्थेचे उपाध्यक्ष विष्णू सावळेराम साळवे, माजी श्रामनेर भगवान खंडागळे, भारतीय बौद्ध महासभा शाखा वासिंद पूर्व आणि मित्र प्रेम मंडळ वासिंद, पत्रकार सुनिल केदारे यांचे सहकार्य लाभले.

## दिव्यांग प्रमाणपत्राआधारे बदली २१ शिक्षकांची विभागीय चौकशी सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) - धाराशिव जिल्ह्यातील अनेक



शिक्षकांनी कर्णबधीर, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग इतर प्रकारचे आजार असल्याचे दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून जिल्हा अंतर्गत बदली करून घेतली होती. बदली करून घेतलेल्या शिक्षकांची उच्चस्तरीय चौकशी समिती गठित करून आरोग्य तपासणी करण्यात यावी अशी तक्रार कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांनी केली होती. तक्रारीवरून जिल्हाशल्य चिकित्सक धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती.

जिल्हाशल्य चिकित्सक यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने एकूण १०० शिक्षकांच्या दिव्यांग प्रमाणपत्र/दुर्धर आजाराने पीडित कर्मचारी यांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची तपासणी केली. तपासणी नंतर १०० पैकी एकूण २१ शिक्षकांनी सादर केलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रात त्रुटी असल्याचे शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद धाराशिव विभागास कळविण्यात आले होते. त्रुटी आढळलेल्या २१ शिक्षकांची विभागीय चौकशी सुरू असून विभागीय चौकशीअंती पुढील कार्यवाही अनुसरण्यात येत आहे अशी माहिती जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. रविंद्र खंदारे यांनी लेखी पत्राद्वारे तक्रारदार तसेच कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांना कळविले आहे.

**प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.रविंद्र खंदारे यांची माहिती**